# १२. रंगरेषा व्यंगरेषा

■ **मंगेश तेंडुलकर** (१९३४ ते २०१७) :

सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार, नाट्यसमीक्षक, अभिनेता, लेखक, दिग्दर्शक आणि समाजव्रती कार्यकर्ता. 'संडेमूड', 'तेंडुलकरी स्ट्रोक्स', 'भुईचक्र', 'रंगरेषा व्यंगरेषा' ही त्यांची पुस्तके. व्यंगचित्रांना शब्दविरहित भाषा म्हणून 'साहित्यिक' वळण देणारा मनस्वी कलाकार. राजकीय आणि विनोदी व्यंगचित्रांबरोबरच समाजकारण आणि तत्त्वांवर भाष्य करणारी व्यंगचित्रे साकारून या कलेत वेगळा पायंडा पाडला. बोलक्या आणि मोजक्या रेषांमधून अधिक आशय व्यक्त करणे हे त्यांच्या शैलीचे वैशिष्ट्य. त्यांनी कुठल्याही महाविद्यालयात कलेचे शिक्षण घेतले नव्हते. त्यांना व्यंगचित्रे रेखाटण्याची नैसर्गिक देणगी होती. ती त्यांनी जनसमूहासमोर ताकदीने मांडली. भारतीय व्यंगचित्रकलेच्या क्षेत्रात एक नवे दालन उघडले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या 'चिं. वि. जोशी' पुरस्काराने त्यांना गौरवण्यात आले. आयुष्याने दिलेल्या नकारांचे होकार करणाऱ्या तेंडुलकर यांच्या भावजीवनाची आणि कलाजीवनाची 'रंगरेषा व्यंगरेषा' ही जीवनकहाणी आहे.

या आत्मचरित्रात्मक पाठात लेखकाने व्यंगचित्रकार म्हणून स्वत:च्या जडणघडणीच्या काळातील काही प्रसंग रेखाटले आहेत. व्यंगचित्रांमध्ये चांगल्या सुधारणा होऊन त्यांना प्रसिद्धी मिळावी यासाठी श्रेष्ठ चित्रकार दीनानाथ दलाल यांनी लेखकाला केलेल्या मार्गदर्शनाचा प्रसंग येथे आला आहे. कोणत्याही क्षेत्रातील नवोदितांनी वेळीच जाणकार तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन कशी प्रगती साधावी हे या प्रसंगातून सूचित होते. डोळस निरीक्षणातून व्यंगचित्रांविषयीच्या कल्पना कशा सुचतात हे लेखकाने स्त्रीभ्रूण हत्येच्या पोस्टरच्या उदाहरणातून स्पष्ट केले आहे. व्यंगचित्र ही नि:शब्द भाषा असून शब्दांपेक्षाही ती अत्यंत मार्मिक असते आणि ती परिणामकारकरीत्या काव्यात्म अभिव्यक्ती कशी साधू शकते हे आईच्या चित्राच्या उदाहरणातून त्यांनी दाखवून दिले आहे. ज्याला कलाकार म्हणून मोठे व्हायचे आहे त्याने सतत शिकत राहिले पाहिजे, हे लेखकाने व्यंगचित्र प्रदर्शन पाहण्यासाठी आलेला शेतकरी आणि त्याच्या कुटुंबाच्या उदाहरणातून स्पष्ट केले आहे.

मला व्यंगचित्रांसाठी अखंडपणे विषय मिळत राहणं हा मूळ प्रेरणेचा भाग सुदैवानं माझ्यासाठी कधी अडचणीचा ठरला नाही. विचारांचा पाठलाग करत क्षितिजापर्यंत जाण्याची माझी सवय हा माझा यातला एक महत्त्वाचा स्रोत आहे. ज्या विचाराचा पाठलाग करतो तो विषय हाती लागत नाहीच; पण त्या वाटेवर काय काय नवीन नवीन सापडत जातं, त्याचीच व्यंगचित्रं होतात.

मी बऱ्याच कार्यक्रमांना जात असतो. तिथेही या चित्रांचे स्रोत मला सापडतात. असले कार्यक्रम हे कच्चा माल पुरवणारे मार्ग आहेत माझे. प्रयत्न केला तर किती चांगले धागे हातात येतात याचं प्रत्यंतर देणारा एक प्रसंग एका अतिशय साध्याशा कार्यक्रमात घडला. प्रथेप्रमाणे त्या लोकांनी मला पुष्पगुच्छ आणि नारळ दिला. तो घेऊन मी टेबलावर ठेवला आणि शांतपणे खुर्चीत बसलो होतो. बोलणारा माझी कुठून कुठून जमवलेली माहिती उपस्थितांना सांगत होता. मला त्यात स्वारस्य नव्हतं. मी टेबलावरच्या नारळाकडे बघत होतो. बघता बघता मला ती नारळाची शेंडी, नारळाचा तो लहानसा आकार पाचसात वर्षांच्या मुलीच्या डोक्यासारखा वाटायला लागला. नारळाची शेंडी तिच्या पोनीटेलसारखी बांधलेली! हे स्मरणात घिरट्या घालायला लागलं. कार्यक्रम संपला. घरी आलो. बाकी सगळी कामं नेहमीसारखी सुरू होती. रात्री दहानंतर मी समोर ड्रॉईंगपेपर घेऊन बसलो होतो. त्यावर चित्र चितारत गेलो ते अशा क्रमानं. देवळासमोर दगडावर आपटून नारळ फोडतात. नारळ फोडणारा तो पुरुषी हात मी चितारला. तो नारळ नसून ते चिमुरड्या मुलीचं डोकं आहे हे सूचित व्हावं म्हणून त्या नारळाला बारीकसा कानातला डूल दाखवला.



त्यानं तो नारळ दगडावर आपटण्यासाठी वर उगारलाय आणि त्याचबरोबर मी दुसरा एक हात दाखवलाय ज्या हातानं तो नारळ उगारलेला पुरुषी हात धरून ठेवलाय. स्त्रीभ्रूण हत्येबद्दलचं एक पोस्टर त्यातून तयार झालं. ज्यांना लिहिता-वाचता येत नाही त्यांच्यापर्यंतही हा संदेश मला पोहोचवता आला. त्या समारंभाला मी गेलो नसतो तर मला हे सुचलं नसतं.

व्यंगचित्राची कल्पना सुचणं ही प्रक्रिया खरंतर मजेदार आहे. आपण मासे पकडणारे लोक पाहतो. काही जाळी टाकून पकडतात, काही गळ टाकून! त्यात एक समूह असाही आहे, की त्यामधील लोक वाहत्या उथळ पाण्यामध्ये जाऊन उभे राहतात. न हलता शांतपणे; पण सावध असे ते उभे असतात. एखादा मासा गाफिलपणे त्यांच्या पायाजवळून जातो. तो मासा हातानं झडप घालून ते पकडतात आणि जमिनीवर ठेवतात. ही माणसं मी पाहिलेली आहेत. वाहत्या आयुष्यामध्ये जर सावधगिरीनं उभं राहिलं, तर व्यंगचित्राची कल्पना अगदी जवळून जाते. ती तिथून उचलायची आणि कागदावर उतरायची एवढाच भाग असतो. व्यंगचित्राची नेमकी कल्पना मनात ठेवून चित्रं रेखाटताना कधीतरी अचानकपणे आपली एखादी सुप्त इच्छा त्या चित्रात स्वतंत्र रूप घेऊन उतरून येते.

अशी अनेक चित्रं काढता काढता एका क्षणी माझ्या लक्षात आलं, की व्यंगचित्रं ही नि:शब्द भाषा आहे. त्या रेषांना शब्द नाहीत; पण तरीही ती एक प्रभावी भाषा आहे. मला वाटतं तशी ती खरंच भाषेइतकी संवादी आहे का हे अजमावण्यासाठी म्हटलं, घेऊ अनुभव! माझे हे खेळ सुरू झाले. एखादी सुंदर काव्यात्म कल्पना व्यंगचित्रातून व्यक्त करता येते का? तर उत्तर आलं 'येते'. हे मी स्वत: अनुभवलं. व्यंगचित्रातून एखाद्या माणसाबद्दलची भावना व्यक्त करता येते का? तर तीही येते. शब्दांतूनसुद्धा ती व्यक्त होणार नाही इतकी छान करता येते. व्यंगचित्राच्या भाषेला जी मार्मिकता आहे ती शब्दाहून प्रभावी आहे. अशी जी काव्यात्म चित्रं मी रेखाटली त्यातलं एक 'आई'विषयी सारं काही सांगण्यासाठीच होतं. आईचं नातं हे सगळ्या जगातलं एकमेव खरं आणि सुंदर नातं आहे. बाकीची नाती ही जोडलेली असतात. माणसांमध्ये मला जर कुठे ईश्वराचा अंश दिसत असेल तर तो आईमध्ये दिसतो. हे नातं मला कसं दिसतं हे व्यक्त करण्यासाठी मी जे चित्र काढलेलं होतं, त्यात उन्हाळ्यातला वैशाख वणवा आहे. त्यात एक सुकलेलं झाडपण आहे. एकही पान नसलेल्या त्या झाडाच्या फांदीवर एका पक्ष्यानं घरटं केलेलं आहे. त्या घरट्यात चोच उघडून आकाशाकडे बघणारी तीनचार पिल्लं आहेत आणि त्या पिल्लाची कणसदृश्य आई पार आकाशात गेलीय. दूरवर सापडलेला एक पावसाचा ढग ती चोचीनं घरट्याच्या दिशेनं ओढून आणतेय. आता आई हे नातं मी कितीही शब्द वापरले तरी या चित्रासारखं मला व्यक्त करता येणार नाही. हे व्यक्त झालं असेल तर हा मोठेपणा माझा नाही. ही या माध्यमाची ताकद आहे. मी या चित्राखाली काही लिहीत नाही. हे चित्र आवडल्याचं सांगत अनेक लोक माझ्याकडे येतात. ते का आवडलं हे त्यांना सांगता येत नाही; पण त्यातला आशय त्यांच्यापर्यंत पोहोचतो म्हणूनच ते त्यांना आवडलेलं असतं.

व्यक्त होण्याची गोष्ट खूप पुढे नेत नेत मी माझ्या वडिलांना माझ्या व्यंगचित्रांमधून खूप मनापासून श्रद्धांजली वाहिली. या चित्रांमधल्या पहिल्या चित्रात मी भर पावसात उभा आहे आणि माझ्या डोक्यावर दोन अक्षरं आहेत 'बाबा'. पाऊस 'बाबा' या शब्दाच्या दोन्ही बाजूंनी पडतो आहे. खाली इवलासा मी सुरक्षित आहे. मी त्यात माझं लहानपण दाखवलंय. दुसऱ्या चित्रात आता ते शब्द नाहीयेत; पण तरीदेखील तो पाऊस माझ्या दोन्ही बाजूंनी जातो आहे. मी तिथे उभा आहे तो आत्ताच्या वयाचा-पंचाहत्तरी पूर्ण केलेला आहे. बाबांनी जे काही माझ्यासाठी निर्माण करून ठेवलं आहे ते त्यांच्यामागे आत्तापर्यंत मला खूप मोठा आधार, खूप मोठा आश्रय देत आलं आहे. माझ्या व्यंगचित्रातून मी हेही व्यक्त करू शकलो.

माझ्या व्यंगचित्रांची प्रदर्शनं भरवण्याचे माझे जे जगावेगळे हेतू आहेत, त्यात व्यंगचित्राचा परिचय 'एक छान भाषा' म्हणून करून देणं हाही आहे. पुणे, मुंबई, गोवा, दिल्लीपासून महाराष्ट्रातल्या अनेक छोट्या शहरांपर्यंत कितीतरी ठिकाणी माझी प्रदर्शनं झाली. या प्रदर्शनांमधला माझा सगळ्यात चांगला अनुभव आहे तो वाईसारख्या छोट्या शहरामध्ये लोकमान्य वाचनालयामध्ये प्रदर्शन भरवलं होतं तेव्हाचा. जुनी कौलारू वास्तू होती ती. उद्घाटन झालं. दुसऱ्या दिवशी मी आणि लता दोघंही खुर्च्या टाकून शांतपणे बसलो होतो. तिथे खाली रस्त्यावर उतरणारा जिना होता. रस्त्यावर एक वीसबावीस जणांची

शेतकरी कुटुंबाची ट्रॅक्टरट्रॉली थांबली. तिथे काही दुकानं होती. मला वाटलं ती मंडळी त्या दुकानांमध्ये आली असतील. मी कुतूहलानं पाहत होतो. मंडळी ट्रॉलीमधून उतरली आणि जिना चढून वर प्रदर्शनाकडे आली. मला बरं वाटलं. त्यांच्यासोबत सत्तरीच्या आसपासचा कुटुंबप्रमुख होता. पांढऱ्या मिशा, रंग काळाकभिन्न, डोक्याला केवढंतरी मोठं मुंडासं बांधलेलं. नखशिखान्त शेतकरीपण वागवणारा तो आणि त्याच्या घरातली मुलं-नातवंडं प्रदर्शन पाहायला लागली. हा कुटुंबप्रमुख माझ्या प्रत्येक चित्रासमोर उभा राहत होता आणि त्याच्यामागे उभे राहिलेल्या त्याच्या माणसांना अर्थ समजावून सांगत होता. तो काय सांगत होता ते मी शांतपणे ऐकत होतो. तो कुठल्या चित्रासमोर उभा आहे तेही मला दिसत होतं आणि मनाची स्वच्छ पाटी घेऊन आलेल्या या शेतकऱ्यापर्यंत हे चित्र कसं पोहोचतंय हे मी थेट अनुभवत होतो. चित्रं चितारताना माझ्या मनात होतं ते आणि आत्ता त्याच्यापर्यंत पोहोचत होतं ते याच्यात जी तफावत मला जाणवत होती ती तशी का जाणवत होती हे मी मनोमन समजून घेत होतो. हे माझं केवढं तरी मोलाचं शिक्षण होतं, जे मला एखाद्या विद्यापीठातही मिळालं नसतं ते त्या अनोळखी शेतकऱ्यानं त्या दिवशी मला दिलं.

व्यंगचित्रांच्या प्रसिद्धीसाठी प्रारंभीच्या काळात मी केलेली धडपड आठवली, की गंमत वाटते. तेव्हाचा तो काळ मोठा अवघड होता. मासिकं, नियतकालिकं यांना मी सतत चित्रं पाठवायचो आणि ती सतत परत यायची. त्या चित्रांसाठी मी अपार मेहनत केलेली असे, ती स्वीकारली जात नव्हती, त्यांची स्वतंत्र ओळख तयार होत नव्हती या सगळ्यांचा मी बऱ्यापैकी मनस्ताप करून घ्यायचो. नाव नाही म्हणून प्रसिद्धी नाही आणि प्रसिद्धी नाही म्हणून नाव नाही या चक्राच्या तळाशी गोल गोल फिरत होतो. एखादं दुसरं चित्र प्रसिद्ध व्हायचं तर पन्नासएक परत यायची. या काळात तीन संपादकांनी मात्र मला हात दिला. दीनानाथ दलाल हे त्यापैकी एक होते. या श्रेष्ठ चित्रकाराचं ऑफिस मुंबईत केनेडी ब्रीजला होते. तो पत्ता मी त्यांच्याच मासिकावरून उतरून घेतला. त्यांना पोस्टकार्ड टाकलं, 'मला तुम्हांला भेटायला यायचंय' असं लिहिलं. मला असं वाटत होतं, की 'दीपावली' मध्ये माझी चित्रं प्रकाशित झाली तर बाकीच्या मासिकांतून ती विनातक्रार स्वीकारली जातील. मग मी 'दीपावली' साठी खास चित्रं तयार केली. दरम्यान दलालांनी मला भेटीचा दिवस व वेळ कळवली. ठरल्या दिवशी सकाळी जनता एक्स्प्रेसनं मी मुंबईला गेलो.

चर्नी रोडला उतरलो आणि केनेडी ब्रीजला गेलो. दलाल किती वाजता ऑफिसमध्ये येणार आहेत, आलेत का? हे विचारण्यासाठी मी ऑफिसमध्ये फोन केला. फोन खुद्द दलालांनी घेतला. 'नमस्कार, मला दीनानाथ दलालांशी बोलायचंय' मी म्हणालो. 'स्पीकींग!' त्यांचा आवाज इतका स्त्रीच्या आवाजासारखा होता, की दलाल स्वत: बोलत असतील असं मला वाटलंच नाही. मी त्यांना पुन्हा सांगितलं, 'मला श्रीयुत दीनानाथ दलाल यांच्याशी बोलायचं आहे. मी मंगेश तेंडुलकर.' 'स्पीकींग स्पीकींग...' त्यांनी मंजुळ आवाजात आणखी दोनदा सांगितलं. 'अहो, मला तुमच्याशी नाही बोलायचं. मला संपादक दीनानाथ दलालांशी बोलायचं आहे. तुम्ही मला बोलू देणार आहात की नाही?' माझा आवाज थोडा वाढला. ते मला म्हणाले, 'अहो तेंडुलकर, मी दीनानाथ दलाल!' मी किंचितसा अवघडलोच. म्हटलं, 'तुम्ही ऑफिसमध्ये आहात ना हे विचारायला मी फोन केला.' 'हो, आहे मी. या तुम्ही', ते म्हणाले आणि मी त्यांच्या ऑफिसमध्ये गेलो. पहिल्या मजल्यावर त्यांचं ऑफिस होतं. 'ये. बस.' अगदी तोच आवाज. टेबलवर इझेल ठेवून ते काम करत होते. माझ्या मोठ्या बंधूंचा-विजयचा आणि त्यांचा परिचय होता. तोपर्यंत विजय लेखक म्हणून प्रसिद्ध झालेला होता. मी प्रथमच त्यांच्यासमोर गेलो होतो. 'तू विजयचा कोण?' दलालांनी विचारलं. 'कुणीही नाही.' मी क्षणार्धात सांगून टाकलं. काही क्षण भुवया उंचावून गंभीरपणे त्यांनी माझ्याकडे बघितलं. माझ्याकडे बघत म्हणाले, 'ठीक आहे! दाखव काय चित्रं काढली आहेस?' माझी व्यंगचित्रं त्यांना दाखवली. ती पाहून त्यांनी मला त्यांच्या खुर्चीच्या मागे येऊन उभं राहायला सांगितलं. राहिलो. दलालांनी कोऱ्या कागदाचे तुकडे ड्रॉईंगबोर्डवर ठेवले. माझं चित्र शेजारी धरून ब्रशच्या फटकाऱ्यांनी त्यांनी ते पुन्हा त्या कागदाच्या तुकड्यांवर चितारलं. म्हणाले, 'व्यंगचित्रातला नवा ट्रेंड हा असा आहे. कमीत कमी रेषा, कमीत कमी तपशील आणि त्यातून जास्तीत जास्त आशय. तोही शब्दांशिवाय! तुझी चित्रं चांगली आहेत; पण तुझी पद्धत जुनी झाली आहे आता. चित्राला एक परस्पेक्टिव्ह असतं.

सगळी चित्रं सपाट नाही काढायची. त्याला खोली असायला हवी.' खोली कशी घ्यायची हेही त्यांनी मला दाखवलं. म्हणाले, 'मी सांगितलेलं लक्षात ठेव आणि ही चित्रं पुन्हा काढून पाठव.' औपचारिक शिक्षण म्हणतात ते माझं असं दीनानाथ दलालांकडून झालं. पंधरा-एक मिनिटांत त्यांनी ती सातआठ चित्रं पुन्हा चितारून दाखवली. दलालांनी आपलं महत्त्वाचं मार्गदर्शन संपवून चहा मागवला. गप्पा सुरू झाल्या. बोलता बोलता एके ठिकाणी चुकून मी विजयचा एकेरी उल्लेख केला आणि मीच दचकलो.

माझ्याकडे शांतपणे पाहून ते म्हणाले, 'तू खोटं बोलतोयस हे तेव्हाच माझ्या लक्षात आलं होतं. कबूल कधी करतोयस त्याची वाट बघत होतो; पण तू असं का म्हणालास? तुझं त्याच्याशी भांडण वगैरे आहे का?' मी म्हटलं, 'अजिबात नाही. तो माझा सख्खा भाऊ आहे आणि त्याच्याबद्दल मला खूप आपुलकी आहे; पण त्याच्या खांद्यावर उभं राहून मला मोठं नाही व्हायचं. त्याचा भाऊ म्हणून माझी चित्रं तुम्ही घ्यावीत असं मला वाटलं नाही, म्हणून मी तसं म्हणालो.' दलाल म्हणाले, 'मला आवडलं. अशी माणसं क्वचितच सापडतात. तू चित्र तयार करून पाठव. मी घेतो.'

मी पुण्याला परत आलो. दोन दिवसात त्यांना हवी तशी चित्रं तयार केली. पाठवली. पाठवलेली एकूण एक चित्रं 'दीपावली' मध्ये प्रसिद्ध झालेली पाहून मला अतोनात आनंद वाटला.

(रंगरेषा व्यंगरेषा)

## कृती

**(१) (अ) लेखकाने खालील गोष्टी कळण्यासाठी व्यंगचित्रात वापरलेली प्रतीके लिहा.**

| पाठातील गोष्टी | प्रतीके |
|---|---|
| (१) चिमुरड्या मुलीचं डोकं - | |
| (२) आई हे नातं- | |
| (३) भरपावसातली छत्री | |

**(आ) वैशिष्ट्ये लिहा.**

(१) **लेखकाच्या मते व्यंगचित्रांची वैशिष्ट्ये**

(२) **व्यंगचित्राच्या नव्या ट्रेंडची वैशिष्ट्ये**

**(इ) योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट<br>लेखकाची व्यंगचित्रे | 'ब' गट<br>व्यंगचित्रांची कार्ये |
|---|---|
| (१) लेखकाचे स्त्रीभ्रूणहत्येचे पोस्टर | (अ) भाषेइतकी संवादी बनून प्रेक्षकांशी संवाद साधतात. |
| (२) लेखकाच्या मते व्यंगचित्रे ही | (आ) स्वकल्पनाशक्तीने चित्र समजून घेऊन इतरांचे उद्बोधन केले. |
| (३) शेतकऱ्याने व्यंगचित्राचा अर्थ इतरांना सांगताना | (इ) लिहिता वाचता न येणाऱ्यांना संदेश देते. |

**(ई) लेखकाला लागू पडणाऱ्या व्यक्तिवैशिष्ट्यांसमोर ✓ अशी खूण करा.**

(१) लेखकामध्ये जबरदस्त निरीक्षणशक्ती होती. ( )
(२) लेखकाच्या व्यंगचित्रांना सहजासहजी प्रसिद्धी मिळाली. ( )
(३) लेखकामध्ये प्रयोगशीलता पुरेपूर भरलेली होती. ( )
(४) अपेक्षित उत्तर मिळेपर्यंत ते विचारांचा पाठलाग करत. ( )
(५) व्यंगचित्रातला नवा ट्रेंड स्वीकारण्याची वृत्ती नव्हती. ( )
(६) प्राप्त प्रसंगांतून आणि भेटलेल्या व्यक्तींकडून शिकत राहण्याची वृत्ती होती. ( )
(७) नवनिर्मितिक्षमता हा त्यांचा गुण होता. ( )
(८) इतरांच्या आधाराने पुढे जाण्याची त्यांची वृत्ती नव्हती. ( )

**(२) वर्णन करा.**

(अ) वाई येथील प्रदर्शनाला भेट देणारा शेतकरी कुटुंबप्रमुख.
(आ) स्त्रीभ्रूणहत्येबद्दलचे लेखकाने तयार केलेले पोस्टर.
(इ) लेखकाने आईविषयी रेखाटलेले काव्यात्म चित्र.

**(३) व्याकरण.**

**(अ) खालील वाक्यांतील प्रयोग ओळखा व लिहा.**

(१) या चित्रांचे स्रोत मला सापडतात.
(२) हा संदेश मला पोहोचवता आला.
(३) त्यांनी ती सातआठ चित्रं पुन्हा चितारून दाखवली.
(४) मार्गदर्शन संपवून चहा मागवला.

**(आ) खालील वाक्यांचा प्रकार ओळखून सूचनेप्रमाणे तक्ता पूर्ण करा.**

| वाक्य | वाक्यप्रकार | बदलासाठी सूचना |
|---|---|---|
| (१) अशी माणसं क्वचितच सापडतात. | | नकारार्थी करा. |
| (२) ती जुनी कौलारू वास्तू होती. | | उद्गारार्थी करा. |
| (३) तुम्ही मला बोलू देणार आहात की नाही? | | आज्ञार्थी करा. |

**(इ) समासाचे नाव व सामासिक शब्द यांच्या जोड्या जुळवून लिहा.**

| समासाचे नाव | सामासिक शब्द |
|---|---|
| (१) तत्पुरुष समास | (अ) स्त्रीपुरुष, गुणदोष |
| (२) अव्ययीभाव समास | (आ) महात्मा, पंचधातू |
| (३) बहुव्रीही समास | (इ) प्रतिवर्षी, आजन्म |
| (४) द्वंद्व समास | (ई) लक्ष्मीकांत, निर्धन |

**(ई) कंसात समासांची नावे दिलेली आहेत. खाली दिलेल्या सामासिक शब्दांसमोर त्यापैकी योग्य समासाचे नाव लिहा.**

(विभक्ती तत्पुरुष समास, कर्मधारय समास, द्विगू समास, इतरेतर द्वंद्व समास, वैकल्पिक द्वंद्व समास, समाहार द्वंद्व समास)

(१) चहापाणी – ................

(२) सद्गुरु – ................

(३) सुईदोरा – ................

(४) चौघडी – ................

(५) कमीअधिक – ................

(६) जलदुर्ग – ................

### (४) स्वमत.

(अ) 'एखादे व्यंगचित्र हे प्रत्यक्ष भाषेपेक्षा संवादाचे प्रभावी माध्यम असू शकते', या विधानाशी तुम्ही सहमत वा असहमत आहात ते सकारण स्पष्ट करा.

(आ) 'वाहत्या आयुष्यामध्ये सावधगिरीनं उभं राहिलं तर व्यंगचित्राची कल्पना अगदी जवळून जाते', या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(इ) लेखकाने व्यंगचित्रांतून वडिलांना वाहिलेली श्रद्धांजली तुमच्या शब्दांत लिहा.

### (५) अभिव्यक्ती.

(अ) 'स्त्रीभ्रूणहत्या एक अपराध' याविषयी तुमचे विचार स्पष्ट करा.

(आ) 'आईचं नातं सगळ्या जगातलं एकमेव खरं आणि सुंदर नातं आहे', या वाक्यातील आशयसौंदर्य उलगडून दाखवा.

### उपक्रम :

(अ) तुमच्या शाळेतील/महाविद्यालयातील स्नेहसंमेलनात 'व्यंगचित्रांतून सामाजिक प्रबोधन' या विषयावर चित्रप्रदर्शनाचे आयोजन करा.

(आ) 'बेटी बचाओ, बेटी पढाओ ।' यासारखी स्त्री शिक्षणाशी संबंधित पाच घोषवाक्ये तयार करा.

- खाली दिलेल्या मंगेश तेंडुलकर यांच्या व्यंगचित्राचे निरीक्षण करा. या चित्रातून व्यंगचित्रकाराला काय सुचवायचे असेल असे तुम्हांला वाटते. ते तुमच्या शब्दांत लिहा.



.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

***